

# जगायचं कुणासाठी

गणेश विमल महादू सानप

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# जगायचं कुणासाठी?

लेखक : गणेश विमल महादू सानप

# जगायचं कुणासाठी?

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जगायचं कुणासाठी?


## गणेश विमल महादू सानप

मु. कऱ्हे पो. निमोण ता. संगमनेर जि. अ. नगर ४२२६११

९५९४६०७३९२ / ८७९६७३८६१७

ganeshsanap1987@gmail.com

gvsgroup8.blogspot.com

Aadarsha08.blogspot.com

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ ब वर्ग (लेखक) सभासद क्र. ३७०९०



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २ ऑगस्ट २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

जगायचं कुणासाठी?

***लेखक***


*गणेश विमल महादू सानप*

*मु. कऱ्हे, पो. निमोण, ता. संगमनेर जि. अ. नगर ४२२६११*

*९५९४६०७३९२ / ८७९६७३८६१७*

*ganeshsanap1987@gmail.com*

*gvsgroup8.blogspot.com*

*Aadarsha08.blogspot.com*

*अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ ब वर्ग (लेखक) सभासद क्र. ३७०९०*



***प्रकाशक :-*** **ई साहित्य प्रतिष्ठान**

***आवृत्ती १ लि :-***

***प्रकाशन :-***


***अनुभव :-*** *सामाजिक विषयांवर वृत्तपत्रांमधून लेख.*

*ब्लॉग लिहितो.*

*फीदंरी या कथेवर चित्रीकरण चालू आहे.*

*या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनरमुद्रण, नाट्य, चित्रपट अथवा इतर ठिकाणी रूपांतरित करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.*

*या कथेतील सर्व स्थळ, पात्र, आणि प्रसंग काल्पनिक आहेत. या कथेचा आणि पात्रांचा कुठल्याही घटनेशी संबंध अला तर तो निव्वळ योग योग समजावा.*

*ई-साहित्य आणि सर्व टीमचे मनापासून खूप खूप धन्यवाद तुमच्या मुळे अनेक नव नवीन लेखकांना प्लॅटफॉर्म मिळाला. आणि लिहिण्य्साठी प्रोत्साहित करून त्याचं लेखन लोकांसमोर घेऊन आलात.*

# मनोगत





मी संगमनेर तालुक्यातील कर्हे या गावचा रहिवाशी असून सध्या नोकरी निमित्त ठाणे येथे असतो. मला वाचनाची खूप आवड आहे पण लिहिण्याची अशी कल्पना कधी केली नव्हती. माझ्या जीवनात तीन-चार घटना एका-मागे एक अश्या घडल्या की त्यांनी मला लिहित केलं आणि माझ्यातल्या लेखकाला जाग केलं. सर्वच घटना इथे मांडून मी तुमचा अमूल्य वेळ घेणार नाही पण चौथी आणि मला लिहायला प्रेरित करणारी घटना म्हणजे मला झालेली पहिली मुलगी आदर्शां.

माझं पहिलं पुस्तक फीदंरी- भाग एक काही कारणास्तव मी प्रकाशित नाही करू शकलो. कारण त्यावर सध्या चित्रीकरण सुरु आहे.

वाचून पुस्तक आवडल तर नक्की सांगा, त्याच बरोबर काही सूचना असतील तर त्याही सांगा मला तुमच्या प्रोहात्सानाची गरज आहे.

धन्यवाद अपलाच

गणेश विमल महादू सानप

## *पुस्तक लिहिण्यास कारण कि,*

---

*शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर कुटुंबाची सर्वच जबाबदारी पत्नी वर येऊन पडते. परिस्थिती पुढे हात टेकलेला शेतकरी आत्महत्ये सारख्या टोकाला जातो. मग आपल्या संस्कृतीला साजेशी ती विधवा आज पर्यंत चूल आणि मूल याच चौकटीत राहिली अत्ता ति या चौकटीतून बाहेर येऊन या परिस्तिथीला आणि पुढील संकटानां कशी तोंड देणार? कारण इथून पुढे तिची खरी कसोटी असते. शारीरिक आणि मानसिक ताण त्यात समाजापासून आणि नातलगांपासून दुरावलेले संबंध. सरकार आणि प्रशासन एकतर शेतकरी आत्महत्या रोखण्यात अपयशी ठरलेलं आहे. आणि त्यात अश्या घटनांचा कुणालाही खेद नाही. शासनाने मंजूर केलेली मदत हि या कुटुंबापर्यंत पोहचते कि नाही कि निव्वळ मदत जाहीर करून आपली जबाबदारी झटकून टाकायची? एकतर शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी ठोस उपाययोजना केल्याचं पाहिजेत. दुसरं म्हणजे जे आत्महत्याग्रस्त कुटुंब आहेत त्यांच्यासाठी काही तरतुदी करून त्यांच्या कुटुंबाला आधार पोहचेल अशे प्रयत्न व्हायला हवेत.*

*आपण एका बाजूला पुणे मुंबई अंतर अर्ध्या तासात पार पाडण्यासाठी हायपरलूप सारखे प्रयत्न करतोय  पण त्या आधी अश्या आत्महत्याग्रस्त कुटुंबाचा प्रवास किती काटेरी आहे या कडे पूर्णतः डोळेझाक होतेय असं म्हणायला हरकत नाही. एका बाजूला इंडिया घडतोय तर दुसऱ्या बाजूला जगायचं कसं हा प्रश्न आ वासून उभा आहे.*

*म्हणून सर्व शेतकरी बांधवाना एक विनंती करतो कि कितीही संकटं आली तरी आत्महत्या हा शेवटचा उपाय नाही. आणि कधी असा विचार हि डोक्यात आणू नका. आपल्या या निर्णयामुळे आपल्यामागे आपल्या कुटुंबाचे किती हाल होतील, ते कुणाच्या आधारे जगतील हे चित्र डोळ्यापुढे आणा. त्याच बरोबर आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या परिस्थितीचा विचार करा, आपलं सर्व कुटुंब मुलाबाळांच्या चेहऱ्यावरील हास्य कायमच हिरावून घेऊ नका.*

*त्याचबरोबर सर्व नागरिकांना हि विनंती करतो कि आपल्या आसपास जर कुणी शेतकरी संकटात असेल तर त्यांची मदत निस्वार्थी मनाने करा.*

## *समर्पण*

*मी हे पुस्तक माझ्या आई वडिलांना समर्पित करेल कारण, स्वतः अशिक्षित असताना घरची शेतीहि मोजकीच त्यात आई वडील दोघांनीही शेतमजुरी, कधी कधी तीही नाही मिळाली तर बिगाऱ्याची कामं केली. आणि आम्हाला उच्च शिक्षण दिलं. वेळेला स्वतःच्या पोटाला चिमटा घेतला पण (जगायचं कुणासाठी?) आमच्यासाठी जगले.*

*विशेष आभार माझे काका हरिभाऊ गीते, दाजी ज्ञानेश्वर सांगळे, मित्र बी. आर. गांडोळे आणि गोरख सानप तुमच्या सर्वांच्या कृपेने आणि इच्छेने माझा प्रवास इथ पर्यंत आला आणि या पुढे हि तुम्ही असंच सहकार्य कराल हि मनापासून इच्छा*



## पात्र परिचय

- तुकाराम/ तुक्या :- दुष्काळ ग्रस्त शेतकरी
- सुमन/सुमी :- तुकारामाची बायको
- दीपा आणि नितीन :- तुकाराम आणि सुमनची मुलं
- वामनराव :- दुकानदार (वाणी)
- गीता :- वामनराव ची पत्नी
- पाटील साहेब :- गावातील प्रतिष्ठित सावकार
- रखमा :- डाले विकणारा आदिवासी
- हौशी :- रखमाची बायको
- गण्या आणि मन्या :- रखमा आणि हौशी ची मुलं

(सकाळची वेळ तुकाराम दात घासत असतो सुमन चुलीच्या बाजूला बसून चहा बनवत असते. दीपा वाटी घेऊन चहा ची वाट बघत आई जवळ बसलेली असते नितीन ओट्यावर गुळण्या करत असतो)

**सुमी** :- अहो, एकला का? आज गावात जाऊन पावशेर गुळ घेऊन या. नागपंचमीचा सन हाय गहू तर नाही घरात पण काही तरी गोड धोड करून घालता येईल पोरास्नी.

**तुक्या** :- सुमे त्या वाण्याची आधीच उधारी बाकी आहे. उद्या तालुक्याला जाऊन गवंड्याच्या हाताखाली काहीतरी काम शोधतो अन मग आलेल्या पैशातनं त्याची उधारी पहिली मिटवतो अन त्या पाटलाचं पण कर्ज वाढत चाललंय. पुढच्या खेपेला करू सन आता याबारीला राहू दे.

**दीपा** :- अप्पा आज नागपंचमी आम्हास्नी झोका बांधून द्या ना!

**तुक्या** :- हो , हो, झोका बांधून देतो मी तुम्हास्नी.

(तितक्यात पाटील दारात येतो)

**पाटील** :- अरं ये तुक्या हाय का उलाथला.

**तुक्या** :- अहो पाटील सणासुदीचा काय वंगाळ बोलायला लागलेत आत्ताच तुमची आठवण काढली होती.

**पाटील** :- म्हणजे तू पैशे देणार तर माझे आज.

**तुक्या** :- अहो अत्ताच सुमीला म्हटलो उद्या तालुकायला जाऊन गवंड्याच्या हाताखाली काहीतरी काम शोधतो आणि पाटलाचे पैशे मिटवतो.

**नितीन** :- अप्पा खोट बोलायचं नाही तुम्हीच सांगता आणि अत्ता स्वतः मातर खोट बोलताय.

**तुक्या** :- कायरं खोट बोललो म्या

**नितीन** :- तुंही मगाशी म्हटले ना आलेल्या पैशातून पहिले वाण्याची उधारी मिटवायची

**तुक्या** :- तुला नाही कळणार (पाटील मध्येच)

**पाटील** : ये तुक्या ते कार्ट खर तर बोलतय मला बाकीचं माहित नाही तुझ्या भिकाऱ्याच्या दारात मला रोज रोज यायचं नाही, माझे पैशे टाक पहिले अरे कर्ज मिटत नाही तर कशाला घेता जीव दे हरामखोरा.

**तुक्या** :- पाटील तुम्हास्नी चांगलं माहितीय यंदाचा दुष्कळ त्यात थोडं फार पीक आलं ते पण कवडी मोल भावामुळं बाजारात पण नाही नेता आलं (पाटील मध्येच)

**पाटील** :- राहूदे राहूदे तुझं नेहमीच रडगाणं ऐकायला नाही आलो म्या इथं. पुढच्या खेपेला पैशे घेतल्या बिगर जाणार नाही. नाहीतर एखाद तंगड उपसून ठेवलं ध्येनात ठेव.

**तुक्या** :- रडक्या आवाजात हो हो पाटील साहेब! थांबाणा, थोडासा चहा घिऊन जा.

**पाटील** :- काय नग तुझा चहा साल्या इश बिश कालवून मारशील मला.

(तुक्या मनातल्या मनात, ये देवा पुढच्या खेपेला मला एखाद्या जनावराच्या पोटी जन्म दे पण हा शेतकरी जन्म नाको देऊ. हे दररोजच निचकाटाच जगणं नको झालय. तोंड धुऊन चहा प्यायला बसतो चहा पितच असतो सुमी मधीच)

**सुमी** :- काय ओ जातांय ना दुकानात?

**तुक्या** :- (चहाच पित असतो कप बशीवर आदळतो. माझा जीव घ्या एकदाचा मंजी तुम्ही पण सुखी अन म्या पण सुखी.

**सुमी** :- काय ओ सकाळी सकाळी वंगाळ बोलताय आज सन हाय आज तरी असं बोलू नका रोज आहेच आपलं रडगाणं

**तुक्या** :- अन ती थैली (रागातच उठतो)

(तुकाराम गावात किराणा दुकानात पोहचतो दुकानात वामन देवपूजा करत असतो त्याची बायको गीता अंगण झाडत असते)

**वामन** :- आला का तोंड दाखवायला बर झालं मला वाटलं त्या बाजूच्या गावच्या पारश्याने जीव दिला तू पण गेला कि काय?

(हे सर्व एकूण तुक्याची मान खाली जाते तरीही बोलता होतो)

**तुक्या** :- अण्णा आज सण हाय बाकी काही नको पण पावशेर गुळ द्या ना पोरांसाठी, तुमचे पैशे या हफ्त्याला फेडतो मी समदे.

**वामन** :- पावशेर! तुला लाज बीज वाटते का नाही? पहिलीच उधारी द्यायला जमत नाही आणि गुळ द्या पावशेर म्हणे, चाल निघ इथून सकाळी सकाळी थोबाड दाखून बोहनीचा टाइम खराब केला दलिन्दरी.

(तुकाराम चे डोळे पाणावलेले तुकाराम तसाच मागे फिरतो)

(वामन आपल्या बायकोला जी बाजूला अंगण झाडत असते)

**वामन** :- ये गीते थोडासा गोमतीर आणून दुकानात शिंपड नाहीतर धंद्याची सगळी वाट लागलं आज.

(तुकाराम च्या कानावर हे शब्द जातात तुकाराम डोळ्यांचं पाणी पुसत पुसत निघतो रस्त्यात चालत चालत मनात पुटपुटतो, गेली दोन वरिस झाली घरात काही गोडधोड बनवता आल नाही आजचा पण दिवस तसाच जाणार, काय जीवन आहे देवा पोरास्नी दोन घास गोडधोड सणासुदीला पण देऊ नाही शकलो. तितक्यात तुकाराम ची नजर बाजूला झोका खेळत असलेल्या पोरांवर जाते तुकाराम घरी पोहचतो पिशवी ठेवतो. सुमन घरात नसते दीपा आणि नितीन बाहेर खेळत असतात तुकाराम झोका बांधण्यासाठी दोर घेतो मुलांना सांगतो मी शेतावर चाललोय तुम्हाला झोका बांदायला मागणं या तुम्ही तो पर्यंत झोका बांधून ठेवतो)

**दीपा आणि नितीन** :- आनंदाने एकसुरात हो.... अप्पा!

(तुकाराम त्याच्या शेतावर झाडाजवळ पोहचतो आत्महत्या करायचा निर्णय घेतलेला असतो आणलेला दोर फाशी घेण्यासाठी फास बनवतो झाडावर दोर फेकतो दोन तीन प्रयत्न करतो दोर जात नव्हाता.)

तितक्यात समोरून एक जोडपं आणि त्यांची दोन मुलं अंगावर फाटलेले कपडे एका मुलाने शाळेतल्याच कपड्यावर चड्डीला करदोरा बांधलेला एकाचे शर्ट चे बटन वर खाली दोघेही अनवाणी. एकाने आईचा पदर धरलेला एकाने बापाचं धोतरं पकडलेल त्यातील जोडप्याच्या डोक्यावर दोन डाले (कोंबड्या झाकण्या साठीची टोपली) दोघांच्या नजरेत असं लागलेली कि कुणी तरी गिराईक भेटेल सर्वांच्या तोंडावर स्मित हसू त्यांचा संवाद तुकाराम च्या कानावर पडतो.

**मन्या** :- दादा दादा लै भूक लागलीय.

**रखमा** :- हो हो ये बगा आता गावात गेलो का एखाद डाल विकल का बाजार करू आणि आज आपल्याला शिरा खायचंय ना सन आहे आज.

**मन्या-गण्या** :- (आनंदतात) हो हो!

तुकाराम हे सर्व न्ह्याहळत असतो. ती लोक त्याच्या जवळ पोहचतात.

**रखमा** :- (तुक्याला) भाऊ घेता का डाल एखादं?

**तुक्या** :- बाबा या दुष्काळात आमचेच खायचे वांदे झालेत तर कोंबड्या कुठून पाळणार!

**रखमा** :- हो ना काय करणार सगळी वर्च्याचीच किरपा, पाप जास्त झालं भाऊ म्हणून पाणी पाऊस गेला बघा (तितक्यात रखमाची नजर तुक्याच्या हातातील दोरावर पडते) झोका बांधायला आले वाटतं?

**तुक्या** :- हो ना, आज नागपंचमी पोरं सकाळपासून लै माग लागलीत!

**रखमा** :- आपल्या पोरांच्या नशिबी सुख कधी येईल कुणास ठाऊक, रोज सकाळी उठून नवीन गाव हुण्डकायच कधी कधी पोटाला चिमटा घेऊन वेळ मारून न्यावी लागते कधी, कधी तर पाण्यावर रात्र काढावी लागते. पण काय करणार समंदच आपल्या हातात नसत पण लेकरांच्या तोंडाकडे बघितल का सगळं दुःख विसरायला होत बघा. (हौशी मायेने गण्याच्या तोंडावरून हात फिरवते तुक्या त्या गोंडस पोरांच्या तोंडाकडे टक लावून बघतो)

आज तर त्यांना घरून निघतानाच सांगितलंय आज सन आहे आपण आज शिरा बनवायचाय तुमच्या सारख्या एखाद्या देव माणसांनी एखाद डाल घेतल तर त्यांची भरपूर दिवसांची इच्छा पुरी करून त्यांच्या तोंडावरच हे हसू मी टिकवू शकेन. जीवन नकोसा होतो कधी कधी पण हे दोन चेहरे आणि माझ्या हौशीच तोंड बघितल का मला हुरूप येतो तहान भूक पळून जाते आणि खूप खूप जगावं वाटतं बघा.

तितक्यात दीपा आणि नितीन येतात

**दीपा** :- तुक्याचा हात धरून अप्पा तुम्ही झोका नाही बांधला अजून (रडक्या आवाजात)

**तुक्या** :- नाही ग दीपें या काकांबरोबर बोलत होतो जरा वेळ थांब बांधतो लगेच.

(रखमा ची नजर त्या दाव्यावरील बनवलेल्या फासावर जाते अहो भाऊ झोका असा नाही बांधत मी देऊ का बांधून)

**तुक्या** :- नाही व चुकून झाल ते. मी बांधतो

**रखमा** :- बरं बरं! निघतो आम्ही लेकरांची काळजी घ्या .

(रखमा आणि त्याच कुटुंब गावच्या दिशेने निघतात त्याच्या मुलांबरोबर खेळत खेळत दीपा आणि नितीन पण थोड पुढे जातात)

**तुक्या** :- वर देवाकडे बघतो हे देवा बर झालं तू माझे डोळे उघडलेस मी माझ्या लेकरांचा चेहरा कधी वाचलाच नाही किती घाण विचार मनाला शिवून गेला आज. माझ्या पेक्षा किती गरीब आहेत हि लोक पण किती आनंदात जगतायत आणि मी काय करायला निघालो होतो

डोळयांत पाणी आलेलं असत. तितक्यात दीपा आणि नितीन परत येतात तुक्याचा हात हातात घेऊन

**दिपा नितीन :-** अप्पा नका ना रडू आम्हाला पण रडू येतंय. तुका दोघांना गळयाशी कवटाळतो मला माफ करा लेकरानो मी आज तुम्हाला काही गोड धोड नाही देऊ शकलो.

(नितीन आणि दीपा तुक्याचे डोळे पुसत)


**दीपा** :- जाऊद्या अप्पा आम्हाला फक्त झोका बांधून द्या आणि आमच्या जवळ थांबा

तुक्या पुन्हा दोघांना कवटाळतो वर देवाकडे बघत हात जोडत.

तुम्हाला सोडून कुठेच नाही जाणार म्या अत्ता!

**समाप्त**

---



पुस्तक म्हणजे असतं तरी काय? वाचन का करावे?

तुम्ही एकदा असा विचार करून बघा. आपल्या आजुबाजूला अंगमेहनतीची, त्रासाची, कधी कधी किळस येईल अशी तर कधी धोक्याची कामं करणारी माणसं आपण पहातो. त्यांना ती कामं का करावी लागतात? त्यांना वाटत नाही का की AC मध्ये बसून मस्त आराम करावा? पण शिक्षणाच्या अभावी त्यांना ती करावी लागतात. आणि शिक्षण म्हणजे काय? एक तर पुस्तकं वाचणं किंवा ज्यांनी पुस्तकं वाचली अशांकडून ऐकणं, पहाणं. आपल्यात आणि वर उल्लेख केलेल्या लोकांत फ़रक काय असेल तर पुस्तकांचा. आणि म्हणून म्हणतात की पुस्तकं हे गुरू, मित्र आणि मार्गदर्शक असतात. पुस्तकांवर प्रेम करा. वाचा. आत्मसात करा. तुमची जगाकडे पहाण्याची नजर बदलेल. आणि जगाची तुमच्याकडे पहाण्याची नजर बदलेल.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. आपल्या आजूबाजूला वाचक तयार करूया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

आम्ही बि घडलो

तुम्ही बि घडाना

वाचनाने माणूस सर्वार्थाने श्रीमंत होतो.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.